दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२०६
२५६०१२०१
२५६०१२०२
फॅक्स : ०२०-२५६९१३४१


# पुणे विद्यापीठ


परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

Website : www.unipune.ernet.in
E-mail : coe@unipune.ernet.in


## अत्यंत महत्वाचे

संदर्भ : परीक्षा/समन्वय/१५८६ दिनांक : २७ डिसेंबर, २०१०

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये.

**विषय : प्रथम वर्ष बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी./ बी.बी.ए./बी.सी.ए./ बी.बी.एम.(आय.बी./बी.एफ.टी. या अभ्यासक्रमांची परीक्षा केंद्र सिमित केल्यामुळे (क्लबिंग) उत्तरपत्रिका तपासण्याबाबत.**

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून उपरोक्त अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबतचे सविस्तर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

ज्या महाविद्यालयांना परीक्षा केंद्र असणार नाही अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सोय विचारात घेऊन नजिकच्या महाविद्यालयांकडे परीक्षेची सर्व व्यवस्था सोपविण्यात आलेली आहे. यानुसार काही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सत्रपध्दतीच्या (ऑक्टोबर, २०१०) परीक्षा केंद्राचे क्लबिंग करुन नजिकच्या महाविद्यालयात परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत. याबाबत इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका कोणी तपासावयाच्या याबाबत काही महाविद्यालयांनी मार्गदर्शन मागितलेले आहे. सदर मुद्दा लक्षात घेता आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१. ज्या महाविद्यालयांमध्ये परीक्षा केंद्राचे क्लबिंग केलेले आहे त्यांनी संबंधित इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी ते ज्या मूळ महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत त्या महाविद्यालयाच्या को-या उत्तरपत्रिका परीक्षेच्या वेळेस वापरावयाच्या असून परीक्षा झाल्यानंतर लगेचच सदर लिहिलेल्या उत्तरपत्रिका संबंधित मूळ महाविद्यालयाच्या ताब्यात देण्यात याव्यात.

२. संबंधित मूळ महाविद्यालयाने त्या उत्तरपत्रिका विद्यापीठ मान्यताप्राप्त परीक्षकांकडून (स्वत:च्या महाविद्यालयात उपलब्ध नसल्यास इतर महाविद्यालयातील परीक्षकांकडून) तपासून घेऊन निकाल जाहीर करणे, गुणपत्रके देणे इ.पुढील सर्व कार्यवाही

करावयाची आहे. तसेच संबंधितांना महाविद्यालयाच्या परीक्षा शुल्काच्या हिश्श्यातून विद्यापीठ नियमानुसार देय मेहनताना अदा करावा.

३. ज्या महाविद्यालयामध्ये परीक्षा केंद्र आहे त्या महाविद्यालयाला संबंधित इतर मूळ महाविद्यालयांने त्यांच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबत आयोजन केले आहे म्हणून त्या महाविद्यालयास झालेल्या खर्चापोटी महाविद्यालयाच्या परीक्षा शुल्काच्या हिश्श्यातून विद्यापीठ नियमानुसार देय असलेली रक्कम अदा करण्यात यावी.

४. ज्याज्यावेळी प्रथम वर्षाच्या उपरोक्त अभ्यासक्रमाच्या परीक्षा केंद्राचे क्लबिंग केले जाईल त्यात्यावेळी उपरोक्त तरतूदी लागू होतील.

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर पत्राचा आशय सर्व संबंधित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठास नेहमीप्रमाणे सहकार्य करावे. विद्यापीठाच्या सर्व परीक्षांच्या आयोजनाचे काम ही आपणा सर्वांची वैयक्तिक व सांघिक जबाबदारी आहे. या कामी आपण व आपले अध्यापक, अध्यापकेतर सेवक, सहकारी विद्यापीठास नेहमी सहकार्य करीत आलेला आहात व यापुढेही आपण आपले सहकार्य देत राहाल असा विश्वास वाटतो.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.शि.मो.आहिरे)
परीक्षा नियंत्रक